महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - ११ वे ■ अंक क्र. - २६९ ■ शनिवार दि.१७ मे २०२५ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४

आपला व्यवसाय वृध्दिंगत होण्यासाठी दैनिक आवाजमध्ये जाहिरात करण्याची सुवर्णसंधी!
एक महिना - २४९९/- रु.
तीन महिने - ५९९९/- रु.
सहा महिने - ९९९९/- रु.
※ संपादक ※
मो. क्र. ९५४५९१०१७७/८९९९९२१९९४

# नाशिक जिल्हा परिषद चा - राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण उपक्रम

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**चंदन खरे, नाशिक** - दिनांक १६ मे रोजी राष्ट्रीय डेंग्यू दिवस दरवर्षी साजरा करण्यात येतो. डेंग्यू विषयी जनतेमध्ये जागृती निर्माण होऊन डेंग्यू विरोधी उपाय योजनांच्या अंमलबजावणीमध्ये लोकांचा सक्रीय सहभाग प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीने दर वर्षी विविध उपक्रमाद्वारे जनतेपर्यंत माहिती पोहचविण्याचा प्रयत्न करणे हा मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. या वर्षाचे घोषवाक्य आहे  तपासा,स्वच्छ करा आणि झाकून ठेवा : डेंग्यूला हरविण्याचे उपाय करा  असे आहे. डेंग्यू आजारावर नियंत्रण आणणे करिता आरोग्य विभागामार्गात  वर्षभर विविध कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत.

डेंगी हा आजार एडीस इजिप्टाय या डासाच्या मादीच्या चावण्यामुळे होतो. या डासाची उत्पत्ती रांजन, हौद , पाण्याच्या टाक्या ,कुलर्स, कारंजे फुलदाण्या इ. ठिकाणच्या स्वच्छ पाण्यात होते. घराभोवतालच्या परिसरात अडगळीच्या वस्तूंमध्ये विशेषतः जुन्या




टायर्स मध्ये साठलेल्या पाण्यात हे डास वाढतात. या आजाराचे वेळेत निदान व उपचार न मिळाल्यास  हा आजार एक गंभीर व जीवघेणा ठरू शकतो.

राष्ट्रीय डेंग्यू दिवसाच्या निमित्ताने जिल्हा परिषद, जिल्हा हिवताप कार्यालय व नाशिक महानगर पालिका यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्य कार्यकारी अधिकारी  आशिमा मित्तल, उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक मंडळ डॉ.कपिल आहेर, मा.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा सामान्य रुग्णालय येथे जनजागरण पर प्रदर्शन तसेच प्रभात फेरी चे आयोजन करण्यात आले होते. रॅलीचे उद्धाटन .सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (हिवताप) नाशिक विभाग डॉ.विवेक खतगावकर, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.सुनिता पिवळतकर , हत्तीरोग अधिकारी डॉ.राजेंद्र त्रम्बके , जीवशास्त्रज्ञ डॉ.नितीन रावते यांनी हिरवा झेंडा दाखवून रॅली/ प्रभात फेरी ची सुरुवात केली . सदर रॅलीत हिवताप विभागाकडील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी उस्फुर्त सहभाग नोंदविला.

डेंग्यू प्रमुख लक्षणे व दुष्परिणाम :-
१)डेंग्यु तापाच्या प्रमुख लक्षणांमध्ये रुग्णास एकाएकी तीव्र ताप येतो . तीव्र डोकेदुखी, स्नायुदुखी, सांधेदुखी,उलट्या होणे, तीव्र डोळे दुखी ,तसेच अशक्तपणा ,भूक मंदावणे ,तोंडाला कोरड पडणे,अंगावर पुरळ येणे इत्यादी लक्षणे जाणवतात. २)अतिशय धोकादायक असा रक्तस्त्राव युक्त डेंग्यू ताप यामध्ये वरील प्रमाणे त्यासोबत त्वचेखाली रक्तस्त्राव होणे ,नाकातून रक्तस्त्राव होणे, रक्ताची उलटी होणे ,रक्त मिश्रित किंवा काळसर रंगाची शौचास होणे, पोट दुखणे इत्यादी लक्षणे आढळून येतत .यामध्ये रुग्ण बेशुद्ध होऊन मृत्यु होऊ शकतो.

सार्वजनिक आरोग्य विभागाचे जनतेस नम्र आवाहन -:
१) आपल्या घरातील पाण्याची भांडी व्यवस्थित झाका.
२) घरातील फुलदाण्यातील, कुलर्स, फ्रीज या मध्ये साचलेले पाणी दर दोन -तीन दिवसांनी काढा.
३) घरावरील तसेच घरातील पाण्याच्या टाक्यांना घट्ट झाकण बसवा.
४) खिडक्यांना डास प्रतिबंधक जाळ्या बसावाने
५ ) घराभोवतीचा परिसर स्वच्छ व कोरडा ठेवने
६)  जुने टायर,नारळाच्या करवंत्या,पाणी साचू  शकेल  फुटलेल्या बाटल्या ,प्लास्टिकच्या वस्तू अशा निरुपयोगी वस्तू घराभोवती साठू देऊ नका.
७)  लक्षणे असल्यास त्वरित रक्ताची तपासणी करून घ्या.

किटकजन्य आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वांनी सक्रीय सहभाग घेऊन आरोग्य यंत्रणेला सहकार्य करावे असे आवाहन नाशिक जिल्ह्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे तसेच जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.सुनिता पिवळतकर यांनी केले आहे.

## नगरसुल येथील पिता-पुत्राचा अपघातात मृत्यू, पुतण्या गंभीर

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी येथील वडाचा मळा येथील मोरे यांचे जावंई असुन  बऱ्याच वर्षापासून  नगरसुल  येथील वडाचामळा  येथे  बांधकाम कारागीर म्हणून राहत असलेले किशोर ओंकार सोनवणे वय ४०, मुलगा ऋतिक किशोर सोनवणे वय ११ , पुतण्या रवींद्र बाळू सोनवणे वय २७ हे तिघेजण बुधवारी दुपारी नगरसुल येथून अंतापुर ताहाराबाद येथे दर्शनासाठी गेले असता परतत असताना मनमाड येथे पहाटे पावणे चारच्या दरम्यान बोलेरो पिकअपने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर





पुतण्या रवींद्र सोनवणे जखमी असून त्याला तात्काळ रुग्णालयात दाखल केले औषधोपचार चालू आहे. अपघाती मृत्यू झाल्याने नगरसुल वडाचा मळा परिसरात या घटनेमुळे शोककळा पसरली आहे. किशोर सोनवणे यांचे मूळ गाव गोल्हेवाडी असून ते जावई म्हणून राहत असताना बांधकाम कारागीर म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्या पश्चात आई पत्नी मुलं परिवार आहे.

## नवीन क्रिकेट मैदानासाठी मुंबई क्रिकेट असोसिएशनला मदत करु - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दै. आवाज वृत्तसेवा...**


मुंबई  :  मुंबई  क्रिकेट असोसिएशनला लवकरच शंभर वर्ष पूर्ण होत आहेत. मुंबई क्रिकेट असोसिएशनने एक लाख क्षमतेचे भव्य क्रिकेट मैदान उभारावे. मुंबई क्रिकेट असोसिएशनने प्रस्ताव दिल्यास मैदानासाठी जागा उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच शासन स्तरावर सर्व सहकार्य करण्यात येईल. आजच्या सोहळ्यामध्ये क्रिकेटची पंढरी असलेल्या वानखेडे मैदानावरील स्टॅन्ड्सला जागतिक स्तरावर देशाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या व्यक्तींचे नाव देण्यात येत असल्याचा अभिमान असल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

## भारमच्या सिध्देश जेजुरकरचा न्यूयॉर्क मध्ये डंका

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपक ढोकळे, पिंपळगाव लेप : प्रतिनिधी

येवला तालुक्यातील भारम गावचे सामाजिक कार्यकर्ते विजय जेजुरकर यांचे बंधू व हरिभाऊ जेजुरकर यांचे चिरंजीव सिद्धेश जेजुरकर याने भारतामध्ये इंजिनेअरिंग शिक्षण पूर्ण करून न्यूयॉर्क मध्ये new York University मध्ये MS IN Technology Management From New York University हि डिग्री मिळवली आहे. सिद्धेश चे वडील हरिभाऊ जेजुरकर हे अतिशय कठीण



परिश्रम करून आरटीओ आहे. त्यांच्या मार्गदर्शनाने शिद्देश ने प्राथमिक शिक्षण नाशिक येथे पूर्ण केले व पुढील शिक्षण ठाणे येथे पूर्ण केले व इंजिनियरिंग चे शिक्षण पूर्ण करून दोन वर्षापासून न्यू यॉर्कला एम,एस डिग्री मिळवण्यासाठी गेलेला होता.आणि त्याने आपल्या अथक प्रयत्नांनी आपले स्वप्न साकार केले .त्याच्या या यशाने आई वडिलांचे स्वप्न पूर्ण झाले. सर्व थरातून आज सिद्धेश चे कौतुक होत आहे. आज एका छोट्याश्या गावातील मुलाने एवढे मोठे यश संपादन केले. त्यामुळे भारम गावातील सर्व ग्रामस्थ व नातेवाईक व कुटुंब अतिशय आनंदी आहे.सर्व स्तरातून त्याचे कौतुक होत आहे.

# एसटी होणार स्मार्ट : वायफाय, जीपीएस, कॅमेरे, टीव्हीमुळे प्रवास होणार सुरक्षित

**दै. आवाज वृत्तसेवा...**

किरण घायदार, नाशिक - ग्रामीण भागाची जीवनवाहिनी असणारी एसटीची लालपरी आता कात टाकणार असून ती स्मार्ट होणार आहे.नव्या तीन हजार स्मार्ट लालपरी बसमध्ये वायफाय,कॅमेरे, जीपीएस,टीव्ही,चालक ब्रेथ नालाइज यंत्रणा आणि बस लॉक सिस्टम असणार आहे.सुरक्षित आणि वक्तशीर प्रवासासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर एसटीने स्मार्ट होण्याचे ठरवले असून त्याअंतर्गत या स्मार्ट बस घेण्यात येणार आहेत.

स्वारगेट,पुणे येथील एसटी आगारात एशियाड बसमध्ये एका तरुणीवर झालेल्या लैंगिक अत्याचारापासून धडा घेत एसटीत आता बस लॉक सिस्टीम बसविण्यात येणार असून त्या पार्किंगमध्ये त्या बंद राहणार आहेत.

नव्या बस खरेदीच्या अनुषंगाने बोलावलेल्या बस बांधणी कंपन्यांच्या बैठकीत परिवहन मंत्री तथा एस.टी.महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी वरील माहिती दिली. नव्या बस या प्रवाशांसाठी अधिक सुरक्षित आणि आरामदायी असतील,असा दावाही त्यांनी केला.यावेळी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर व संबंधित खाते प्रमुखांसह बस बांधणी कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



सुरक्षेवर विशेष भर - प्रवासात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी बसेसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. हे कॅमेरे केवळ प्रवाशांच्या सुरक्षेवरच नव्हे, तर चालकाच्या वाहन चालवण्याच्या पद्धतीवरही 'तिसरा डोळा' म्हणून लक्ष ठेवणार आहेत. तसेच, बसस्थानक परिसरात आणि 'पार्किंग'मध्ये उभ्या असलेल्या बसेस पूर्णपणे बंद राहतील, अशी यंत्रणाही बसमध्ये कार्यान्वित केली जाणार आहे.

एलईडी टीव्हीद्वारे माहिती आणि महसूल वाढ - नवीन बसेसमध्ये लावण्यात येणाऱ्या एलईडी टीव्हीच्या माध्यमातून जाहिरातींसोबतच विविध महत्त्वाच्या घडामोडी, तसेच पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांचे संदेश तात्काळ प्रवाशांपर्यंत पोहोचवले जातील. यामुळे प्रवासातही प्रवासी जगभरातील घडामोडींबाबत अद्ययावत राहतील. याशिवाय, बसच्या बाहेरील बाजूसही जाहिरात प्रसिद्धीसाठी एलईडी पॅनल लावले जाणार असून, यातून महामंडळाच्या जाहिरात महसुलात वाढ होण्यास मदत होणार आहे.

आग प्रतिबंधक यंत्रणा - सध्या वाढत्या तापमानामुळे एसटी बसेसला आग लागण्याच्या घटना घडत आहेत. यावर उपाय म्हणून नवीन बसेसमध्ये 'फोम बेस' आग प्रतिबंधक यंत्रणा बसवण्यात येणार आहे. ही यंत्रणा बसमध्ये ज्या ठिकाणी आग लागेल, त्याचा शोध घेऊन तात्काळ फोमच्या साहाय्याने आग विझवण्याचे काम करेल. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे प्रवासी सुरक्षेसोबतच बस अपघातांची संख्या कमी होण्यास आणि बस फेऱ्यांची वक्तशीरता वाढण्यास मदत होईल. यामुळे भविष्यात एसटी खऱ्या अर्थाने स्मार्ट बनेल, असा विश्वास मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी व्यक्त केला.

# दक्षिण भाग विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या सभापती मंगला सूर्यवंशी बिनविरोध

**दै. आवाज वृत्तसेवा...**




प्रशांत कोठावदे, सटाणा: दक्षिण भाग विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या सभापती पदावर संस्थेच्या जेष्ठ महिला संचालिका मंगला बाळासाहेब सुर्यवंशी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सटाणा दक्षिण भाग विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे सभापती बाळा-साहेब देवरे यांनी आवर्तन पद्धतीने आपल्या सभापती पदाचा राजीनामा दिल्याने सभापती पदाच्या रिक्त जागेसाठी आज दिनांक १६ रोजी सोसायटीच्या सभागृहात निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र शेळके यांच्या अध्यक्षतेखाली सभापती पदाच्या निवडणुकीसाठी विशेष बैठक बोलाविण्यात आली होती.

मंगला सूर्यवंशी यांचा एकमेव अर्ज सभापती पदासाठी दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी श्रीमती सुर्यवंशी यांच्या बिनविरोध निवडीची घोषणा केली.

यावेळी संस्थेचे संचालक नागेश पाकळे, बाळासाहेब देवरे, राहुल सोनवणे, पांडुरंग सोनवणे, भिका सोनवणे, बाबाजी सोनवणे, आनंदा सोनवणे, राजेंद्र सोनवणे, कलाबाई सोनवणे,रामदास सोनवणे, यशवंत सोनवणे, महेंद्र खैरनार, यशवंत ठोके, दिगंबर सोनवणे, मुख्य सचिव सुनिल देवरे आदींसह दादाजी सूर्यवंशी, पंडित खैरनार, रमेश सूर्यवंशी, योगेश सूर्यवंशी, बाळा पवार, प्रदिप पाटील, शिवा सूर्यवंशी उपस्थित होते.

# कामटवाडेगांव येथे आज ग्रामदैवत श्री हनुमान यात्रोत्सव

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नवीन नाशिक - वैशाख कृ.५ शके१९४७ शनिवार दिनांक १७/०५/२०२५रोजी यात्राउत्सव नवसाला पावणारे ग्रामदैवत अभिषेकासह पुजन-ाची वेळ सकाळी ६ ते ९ पर्यंत ग्रामदैवत श्री हनुमान पूजन,ग्रामदैवत मरीआई माता पूजन, ग्रामदैवत माऊलाया माता पूजन,ग्रामदैवत मुंजोबा महाराज पूजन,ग्रामदैवत म्हसोबा महाराज पूजन,ग्रामदैवत पीरबाबा पूजन,ग्रामदैवत नथाई माता पूजन,ग्रामदैवत सातीआसरा माता पूजन, व महाराष्ट्र भूषण ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) शनिवार दि. १७/०५/२०२५ रोजी यांचे किर्तन सायं ५.३० ते ८.३० वाजेपर्यंत त्यानंतर ह.भ.प.भारुड सम्राट राजेंद्र महाराज काळे व



सहकारी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध भारुड सम्राट,समाजप्रबोधनकार सिनेकलावंत पारंपारिक भारुड (एक पाऊल व्यसनमुक्तीकडे )रात्री ९. ०० ते १०.०० वाजेपर्यंत हनुमान मंदिर समोर,कामटवाडे गावात होईल तसेच कुस्त्यांची विराट दंगल यात्रेनिमित्त रविवार १८/०५/२०२५ रोजी सायंकाळी ५ ते ७ वाजता होईल सर्वांनी उपस्थित रहावे.असे समस्त कामटवाडे गाव ग्रामस्थ,मटाले परिवार व अनिल काळूशेठ मटाले माजी नगर-सेवक मनपा नाशिक यांनी केले.

# चाळीसगाववासियांच्या सेवेत लवकरच अत्याधुनिक जलतरण तलाव दाखल

**दै. आवाज वृत्तसेवा...**



यशवंतराव ताडगे चाळीसगाव प्रतिनिधी: - अत्याधुनिक सोयीसुविधायुक्त जलतरण तलाव लवकरच शहरवासीयांच्या सेवेत दाखलहोणार आहे असे उद्गार आमदार मंगेश चव्हाण यांनी केले आहे.

चाळीसगाव शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जलतरण तलावाच्या सुशोभीकरण काम अंतिम टप्प्यात असून आज नगरपालिका मुख्याधिकारी, स्विमिंग असोसिएशनचे पदाधिकारी, आजी माजी लोकप्रतिनिधी यांच्यासह कामाची पाहणी केली व आवश्यक त्या सूचना केल्या. जवळपास ३० वर्ष जुन्या या जलतरण तलावाची दुरावस्था झाल्याने जल-तरण प्रेमींनी त्याच्या दुरुस्तीची मागणी केली होती मात्र चाळीसगाव शहराच्या नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असणारा हा ठेवा केवळ दुरुस्ती करून चालणार नाही तर त्याचे आजच्या काळाला साजेल असे नूतनीकरण करून देण्याचा शब्द मी दिला होता. वर्षभरापूर्वी या जलतरण तलावाच्या कामासाठी ५ कोटी निधी मंजूर करून त्याच्या कामाचे भूमिपूजन केले होते. कामाची मुदत १२ महिने असून येत्या २० तारखेपर्यंत केवळ ७ महिन्याच्या विक्रमी वेळात हे काम पूर्ण झाले आहे. लवकरच अत्याधुनिक सोयीसुविधायुक्त असा जलतरण तलाव शहरवासीयांच्या सेवेत दाखल होत असून जास्तीत जास्त जलतरणपटू व प्रेमींनी याचा लाभ घ्यावा.

तसेच हा जरी नगरपालिकेचा जलतरण तलाव असला तरी ,ती आपल्या घरचीच संपत्ती समजून त्याची काळजी घ्यावी असे आवाहन आमदार मंगेश चव्हाण यांनी केले.

# सीमा राणी बागुल यांच्या गर्भारलेल्या मातीतून कविता संग्रहाचे प्रकाशन नाशिक येथे थाटात संपन्न!

**दै. आवाज वृत्तसेवा...**



नाशिक - उदयोन्मुख कवयित्री सीमाराणी बागुल यांच्या 'गर्भारलेल्या मातीतून ' या आशय प्रधान कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा दि.१०मे२०२५ रोजी कवी नारायण सुर्वे कवी कट्टा सिडको येथे पार पडला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी उत्तम कोळगावकर होते. ख्यातनाम साहित्यिक चंद्रकांतदादा वानखेडे ,पुणे यांचे हस्ते या कविता संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.या प्रसंगी डॉ.प्रमोद काकडे, अमरावती मा.केंद्रिय अध्यक्ष अंकुर साहित्य संघ महाराष्ट्र, तान्हाजी खोडे,प्रकाशक ज्ञानसिंधु प्रकाशन , मा.रविकात शार्दुल, मुखपृष्ठकार कु. खुशी मोरे, कवयित्री सीमाराणी बागूल प्रामुख्याने विचारपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कवी राज शेळके यांनी केले. डॉ.प्रमोद काकडे यांनी सीमाराणी बागुल यांच्या काव्य निर्मितीच्या प्रतिभेवर प्रासंगिक आणि समयोचित भाष्य केले.शिक्षिका असलेल्या सीमाराणी यांच्या या कविता समाज प्रबोधक तितक्याच आशयगर्भ व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन केले.

कवयित्री सीमाराणी बागुल यांची कविता म्हणजे वेदनेचा हुंकार असल्याचे ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत दादा वानखेडे यांनी आपल्या भाषणातून सांगितले. गर्भारलेल्या मातीतून वेदनेचा हुंकार कवितांमधून आला आहे. स्रीचे जगणं दुःख आणि दुःखाचे कंगोरे नेमकेपणाने कवियत्रीने शब्दात मांडले आहे. कविता जनमनाचा ठाव घेणारी अस-ावी, सीमाराणी बागुल यांच्या कविता साहित्य दृष्टीने अक्षय आहे. आणि कवितासंग्रहाच्या अंतर्बाह्य धाटणीचे कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ कवी उत्तम कोळगावकर यांनी कौतुक केले.याप्रसंगी सुंदर मुखपृष्ठ रेखाटनासाठी कु.खुशी मोरे हिचा सत्कार करण्यात आला.

दुसऱ्या सत्रात कवी संमेलनाचे परीक्षण जयश्री वाघ, रविंद्र दळवी यांनी केले. कविता सादरीकरणात प्रथम शुभांगी पाटील, द्वितीय सोमदत्त मुंजवाडकर, तृतीय गजानन उफाडे यांच्या कवितांचा सन्मान चिन्ह गुलाब पुष्प शाल देऊन सन्मान करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब गिरी यांनी केले. तर आभार प्रदर्शन सोन-ाली शिरवाडकर यांनी केले.कार्यक्रमास नाशिक जिल्हा व इतर जिल्ह्यातून बहुसंख्य कवी, लेखक, साहित्य रसिकांनी हजेरी लावली.

# मजुरी करणाऱ्या आईच्या कष्टाची जाणीव ठेवत सोनल गायकवाड बाभुळगाव केंद्रात प्रथम

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी : परिस्थिती कितीही बिकट असली, तरीही काही माणसं जिद्द सोडत नाही. नियती अग्निपरीक्षा घेत असते, मात्र त्यातूनही काही जण अगदी ताऊन सुलाखून निघतात. संकटांना थेट भिडणारी आणि आभाळ कोसळलं तरी त्यावर पाय रोऊन उभं राहणारी माणसं इतरांसाठी आदर्श ठरतात. परीक्षा ही बळ देते फक्त एखादी गोष्ट पूर्ण करण्यासाठी अभ्यासू वृत्ती आणि चिकाटी असली पाहिजे. मग जिद्दीसमोर बिकट परिस्थिती देखील हार पत्करते, हेच सिद्ध केले बाभूळगाव येथील एस.एस.एम. विद्यालयातील सोनल किरण गायकवाड हिने दहावी परीक्षेत ९४.२०% गुण मिळवून बाभुळगाव केंद्रात तीने प्रथम क्रमांक मिळवला आहे. सोनल २ महिन्याची असताना आजोबा वारले, आईवडील शे-तात कष्ट करत मुलांना मोठे करत होते. पण संकटांची मालिका काही थांबेना सोनल दोन वर्षांची झाली आणि वडिलांचे अप-घातात निधन झाले.आई शे-तात राबुन,भाजीपाला विकून घर चालवत होती. सोनलला काकांचा आधार होता पण काका देखील ती ११ वर्षांची असताना वारले.घरात गाडीमानुसचं राहिला नाही,आजी, आई लहान भाऊ व सोनल अख्या कुटुंबाचे ओझे खांद्यावर पेलणाऱ्या आईसोबत भाजीपाला विकून अभ्यास करत राहिली अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत दहावीच्या परीक्षेत ९४.२० टक्के गुण मिळवून यश संपादन केले आहे. तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून तिचे कौतुक होत आहे.परिस्थिती बिकट असल्याने



ती शाळा आणि स्वयं अध्ययनावर तिने हे यश मिळविले. मुलीच्या शिक्षणासाठी वाट्टेल ते कष्ट सोसण्याची आईची तयारी आहे. पण शिक्षणावर येणाऱ्या खर्चाची चिंताही तिला सतावत आहे. शीतलच्या या जिद्द व मेहनतीला दातृत्वाच्या पंखांची गरज आहे. जगदंबा एज्युकेशन सोसायटीच्या एस.एस.एम. विद्यालयाची विद्यार्थीनी सोनलने ९४.२० % गुण मिळवून केंद्रात प्रथम आली. आरती गायकवाड ९४ % गुण मिळवून केंद्रात द्वितीय तर समृद्धी भालेराव,वेदिका बुल्हे, वैभव महाले या विद्यार्थ्यांनी ९३.८० % गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकवला आहे.विद्यालयाचा १००% निकाल लागला असून उत्तम निकालाची परंपरा विद्यालयाने यावर्षी ही कायम राखली आहे. दहावी परीक्षेसाठी बसलेले १२२ पैकी १२२ विद्यार्थी पास झाले असून विद्यालयातील २९ विद्यार्थ्यांनी ९० % पेक्षा जास्त गुण मिळवले तर ११४ विद्यार्थी डिस्टिंकशन मध्ये पास होऊन नावलौकिक मिळवला आहे. वर्षभर सातत्याने जादा तासिका, दर आठवड्याला टेस्ट पेपर, विषयतज्ञ यांचे मार्गदर्शन, विविध प्रकारच्या परीक्षांची तयारी विद्यालयात करुन घेतली जाते आणि म्हणूनच विद्यार्थी चांगले यश मिळवत तालुक्यात नावलौकिक मिळवत आहेत व ही परंपरा कायम टिकवण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील आहोत, अशी प्रतिक्रिया प्राचार्य जि.एस येवले यांनी व्यक्त केली.यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थाध्यक्ष माजी आमदार नरेंद्र दराडे,आमदार किशोर दराडे,संचालक रुपेश दराडे,प्राचार्य जी. एस. येवले, उपप्राचार्य ए. जी. कदम,विभागप्रमुख व्हि. आर. परदेशी सर,किरण पैठणकर यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

तालुक्यातील सर्वच विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश मिळविले आहे.आमच्या संतोष कनिष्ठ महाविद्यालयात वर्षभर विद्यार्थ्यांची सर्वतोपरी तयारी करून घेतली जाते.वेगवेगळ्या सराव परीक्षे-चे आयोजन करून परीक्षेसाठी त्यांना सक्षम केले जाते.यामुळेच आमच्या विद्यालयाला दरवर्षी तालुक्यात दर्जेदार निकाल लागत आहे. तालुक्यातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन!
-रुपेश दराडे, संचालक,

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९९२१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरगावला सुरू आहे पुस्तकांविषयी नाविन्यपूर्ण उपक्रम 'पुस्तकांविषयी बोलू काही...'

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डोंगरगाव, ता. निफाड, जि. नाशिक येथे विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जात आहेत .शाळा स्तरावर तसेच वर्ग स्तरावर अनेक उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. या उपक्रमांची अंमलबजावणी करताना विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य वाढावे ,वाचनाचे महत्त्व व गरज समजावी, विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घडावी या हेतूने 'पुस्तकांविषयी बोलू काही....' हा उपक्रम सुरू केला आहे.**

**गरज व महत्त्व –** शाळेत सुसज्ज असे ग्रंथालय आहे ,तसेच 'रूम टू रीड' अंतर्गत उपलब्ध असलेली आकर्षक चित्रांनी उपयुक्त अशी पुस्तके आहेत ,इयत्ता पहिली ते तिसरीला निपुण भारत अभियानांतर्गत प्राप्त झालेल्या साहित्य पेटीत विविध वाचनाची पुस्तके आहेत अशा विविध पुस्तकांचे विद्यार्थी वेळोवेळी वाचन करतात. प्रत्येक वर्गातील विद्यार्थी आपल्या स्तरानुसार वाचन करत असतात .विद्यार्थी विविध प्रकारची पुस्तके वाचतात परंतु त्या वाचलेल्या पुस्तकाविषयी विद्यार्थ्यांना व्यक्त होता आले पाहिजे असे वाटले व या कल्पनेतून शाळेचे मुख्याध्यापक श्री.दिलीप कोथमीरे सर यांच्या मार्गदर्शनाने व शाळेतील शिक्षिका श्रीमती हर्षा पाटील यांच्या नेतृत्वाने विद्यार्थ्यांसाठी 'पुस्तकाविषयी बोलू काही.... 'या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थी विविध पुस्तके वाचतील व पुस्तकाचे लेखक, मुखपृष्ठ, मलपृष्ठ, अंतरंग , बाह्यरंग, प्रकाशक ,मूल्य ,अनुक्रमणिका, गोष्ट, प्रसंग ,पात्र ,आवडलेल्या बाबी यांविषयी विद्यार्थी मोकळेपणाने व्यक्त होतील, शालेय पुस्तकांबरोबरच इतर अवांतर पुस्तके वाचनाची गोडी विद्यार्थ्यांमध्ये तयार होईल हा उद्देश ठेवून या उपक्रमाबद्दल वेळोवेळी विद्यार्थ्यांना माहिती देऊन उपक्रमात सहभागी होण्यास प्रेरणा देण्यात आली.

सर्वप्रथम विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून देण्यात आले, वाचनाने मनुष्य समृद्ध होतो, वाचनाने ज्ञान प्राप्ती होते, वाचनाने चांगले संस्कार होतात या गोष्टीचे विद्यार्थ्यांना महत्त्व पटवून देण्यात आले. विद्यार्थ्यांना पुस्तके वाचण्यात प्रेरित करण्यात आले. विद्यार्थ्यांना पुस्तके निवडण्याची संधी देण्यात आली. पुस्तकांबद्दल काय कसे सांगावे याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थी ग्रंथालयातून पुस्तके घेतात व वाचून झाल्यावर पुस्तके जमा करतात. पुस्तकांविषयी आपला अभिप्राय कागदावर लिहून काढतात.

अधिक वाचनीय पुस्तक विद्यार्थ्यांना मिळावीत या उद्देशाने मुलांच्या वाढदिवसाच्या दिवशी आई वडील मुलांना इतर शाळेतील विद्यार्थीना वाटण्यासाठी चॉकलेट देत असत त्याऐवजी पुस्तके दिली तर वाचनालय अधिक समृध्द होईल.यातून जवळपास नवीन ३५० पुस्तकांची संख्या वाढली.त्याचे ग्रंथपाल म्हणून अनुष्का नागरे ही मुलगी अतिशय नियोजनबद्ध काम सांभाळत आहे.अशा पद्धतीने या उपक्रमाचे नियोजन आहे.

**उपक्रमाची यशस्विता –**

विद्यार्थी अभ्यासाव्यतिरिक्त पुस्तके वाचू लागली .विद्यार्थी आपल्या आवडीनुसार पुस्तकांची निवड करू लागली. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागली. विद्यार्थी पुस्तके समजपूर्वक वाचू लागली. वाचलेल्या पुस्तकाविषयी विद्यार्थी मोकळेपणाने बोलू लागली. पुस्तकाचे लेखक, प्रकाशक, अंतरंग, बाह्यरंग, मूल्य, त्यातील प्रसंग ,पात्र गोष्टी यांविषयी मुक्तपणे व्यक्त होऊ लागली. पुस्तकांविषयी सर्वांसमोर आपले मत मांडायला लागली. वाचलेल्या पुस्तकाचा अभिप्राय थोडक्यात लिहू लागली. सर्वात महत्त्वाचे महावाचन चळवळीत शाळेतील शंभर टक्के विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला व शंभर टक्के अभिप्राय महावाचन पोर्टलवर अपलोड करण्यात आले या उपक्रमाला शाळेतील सर्व इयत्तेतील सर्व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमात शाळेतील सर्व शिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# पीककर्ज नाकारणाऱ्या बँकांविरुध्द कायदेशीर कारवाई करणार – महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नागपूर,दि. १६ : शेतकऱ्यांना वेळेवर मदत व्हावी, त्यांना आर्थिक अडचणीतून मार्ग मिळावा या उदात्त दृष्टीकोनातून शासनाने पीककर्ज योजना सुरु केली. पात्र शेतकऱ्यांनी याचा अत्यंत मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. जे शेतकरी घेतलेल्या पीककर्जाची वेळेत परतफेड करु शकले नाहीत त्यांनी ओटीएस समझोता अंतर्गत कर्जाची रक्कम फेडली. ओटीएस अंतर्गत शेतकऱ्यांनी कर्जफेड करुनही ज्या बँकांनी त्यांना पीककर्ज दिले नाही त्या बॅकांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

नियोजन भवन येथे झालेल्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस आमदार डॉ. आशिष देशमुख, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मिणा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, प्रभारी जिल्हाधिकारी प्रदीप कुलकर्णी, प्रभारी पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, माजी आमदार सुधीर पारवे, अग्रणी बँक व्यवस्थापक मोहित गेडाम व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# उद्या युनिटी फाउंडेशनचा मदर्स डे फॅशन शो

**दै. आवाज वृत्तसेवा...**


स्मिता गोंदकर(अभिनेत्री) अॅड. एकता कदम(आयोजक)

नाशिक : प्रतिनिधी – १८ मे रोजी मातृत्वाच्या प्रेमळ बंधाची उजळणी करत, युनिटी फाउंडेशनतर्फे मदर्स डे निमित्त एक खास फॅशन शोचे आयोजन नाशिक शहरात करण्यात आले आहे. या कार्यक्रमात आई–मुलगी आणि आई–मुलगा वॉक हे मुख्य आकर्षण असेल.

या कार्यक्रमाला प्रसिद्ध मराठी चित्रपट अभिनेत्री स्मिता गोंदकर विशेष पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्या सहभागी मातांना सन्मानित करणार असून, मातृत्वाच्या सन्मानार्थ आपल्या भावना व्यक्त करणार आहेत.या कार्यक्रमाबाबत माहिती देताना युनिटी फाउंडेशन संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा ॲडवोकेट एकता कदम म्हणाल्या, मातांच्या नात्यांना सन्मान देण्याचा आणि समाजात महिला सक्षमीकरणाचा संदेश देण्याचा आमचा उद्देश आहे. या फॅशन शोद्वारे मातांचे योगदान सर्वांसमोर आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. सदर कार्यक्रम समारंभ हा १८मे रोजी १२ते ५ या वेळेत यशवंत हॉल, नांदूर नाका, नाशिक येथे संपन्न होणार आहे. कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन युनिटी फाउंडेशनच्या अध्यक्षा ॲड. एकता कदम यांनी केले आहे.

# जैन कलार समाजाच्या १० जोडप्यांचा सामुहिक विवाह सोहळा थाटात संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

रमेश लांजेवार, नागपूर – जैन समाज मध्यवर्ती मंडळाच्या वतीने जैन कलार समाज भवन, उमरेड रोड रेशिमबाग,नागपूर येथे नुकताच सामुहिक विवाह सोहळा थाटात संपन्न झाला.या ३६ व्या सामुहिक विवाह सोहळ्यात १० जोडप्यांचे शुभमंगल झाले. महत्वाचे म्हणजे विदर्भात सामुहिक विवाहाची सुरूवात जैन कलार समाजापासून झाली आणि आताही सुरूच आहे ही बाब याठिकाणी आवर्जून सांगावे लागेल.याच धर्तीवर विदर्भातील इतरही संपूर्ण समाजाने सामुहिक विवाह करण्याचा पुढाकार घेतला व आज आपण विदर्भातील अनेक समाजामध्ये सामुहिक विवाह सोहळा मोठ्या प्रमाणात होतांना आपण पहातो.या विवाह सोहळ्यात प्रसंगी नवदाम्पत्यांना आपला संसार थाटता यावा या उद्देशाने अनेक समाजबांधवांकडुन मोठ्या प्रमाणात भेटवस्तू देण्यात आल्या सोबतच मध्यवर्ती मंडळातर्फे प्रत्येक जोडप्याला ११ हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला.या सोहळ्यात संपूर्ण विदर्भातील समाजबांधव व भगिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे नेतृत्व मंडळाचे केंद्रीय अध्यक्ष चंद्रशेखर आदमने, उपाध्यक्ष शशिकांत समर्थ, श्रीकांत शिवनकर, सुलेखा अहिरकर,व स्वप्निल समर्थ यांनी केले.सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून आमदार प्रवीण दटके, आमदार कृष्णा खोपडे,माजी मंत्री सुनील केदार, माजी आमदार विकास कुंभारे, माजी आमदार दीनानाथ पडोळे, कॉग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे, माजी अध्यक्ष यादवराव शिरपूरकर, अनिल अहिरकर, अतुल कोटेचा, अनिल मानापुरे, किशोर पलांदुरकर, तानाजी वनवे, रमेश लांजेवार, जानबा मस्के प्रामुख्याने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सचिव कार्तिक शेंडे, उपाध्यक्ष विलास हरडे, कोषाध्यक्ष रविकांत हरडे, सहसचिव विनोद खानोरकर, राजेश पलांदुरकर, डॉ विजय आदमने, शैलेंद्र दहिकर, डॉ. छाया दुरूगकर, माधुरी घोसेकर, संजय शिरपूरकर,संजय खानोरकर,मोरेश्वर मानापुरे,चंद्रशेखर तिडके, सचिन दहिकर इत्यादीसह विदर्भातील संपूर्ण जिल्हा समितीच्या पदाधिकाऱ्यांचे यावेळी सहकार्य लाभले.





# विचारांचा, संस्कारांचा आणि सेवाधर्माचा मार्ग म्हणजे महाराष्ट्र भूषण, तीर्थरूप डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी मार्ग...

**दै. आवाज वृत्तसेवा...**

यशवंतराव ताडगे चाळीसगाव प्रतिनिधी: – महाराष्ट्र भूषण डॉ.श्री.अप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवसाच्या, शुभदिवसाचे औचित्य साधून आज चाळीसगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते हॉटेल दयानंद दरम्यानच्या मुख्य रस्त्याचे नामकरण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी मार्ग असे करण्याचे आणि या मार्गावर भव्यदिव्य असे प्रवेशद्वार भूमिपूजनाचा साक्षीदार होण्याचे भाग्य मला लाभले. अनेक वेळा मी सद्गुरूंच्या कार्यासाठी सेवा करायची इच्छा व्यक्त केली होती. मात्र माझ्या सुदैवाने आप्पा स्वारींची आज्ञा मिळाली आणि त्यातली लहानशी सेवा करण्याचा आज योग आला. आहे असे उदगार आमदार मंगेश चव्हाण यांनी नामकरण सोहळा कार्यक्रम प्रसंगी काढले. यावेळी चाळीसगाव तालुक्यातील आजी माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी यांच्यासह चाळीसगाव परिसरातील हजारो श्री सदस्य उपस्थित होते. श्री सद्गुरूंची परंपरा अखंड टिकवणारे श्री धर्माधिकारी कुटुंबाच्या माध्यमातून सबंध जगभरात श्री बैठकीच्या



रूपाने दासबोधातून सर्व भक्तिमार्ग दाखविल्या जात आहे. समाजाला योग्य दिशा द्यायची असेल, तर समाजाचे योग्य प्रबोधन होणे गरजेचे आहे – आणि हेच कार्य मा.श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांनी सुरू केले आणि त्यांचे सुपुत्र डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी ते अजून व्यापक आणि प्रभावीपणे पुढे नेले. ते केवळ प्रवचनकर्ते नव्हते, ते समाजाचे खरे अर्थाने 'मार्गदर्शक' होते. त्यांनी 'विचारांनी परिवर्तन' ही संकल्पना रुजवली – ज्यामध्ये अंधश्रद्धा, भेदभाव, आणि सामाजिक अडचणींवर विचारांती उपाय सुचवले गेले.

आप्पासाहेब धर्माधिकारी यांचा ठाम विश्वास आहे की समाजात मोठा बदल हवा असेल, तर तो बालकांच्या संस्कारांपासून सुरू व्हायला हवा. म्हणूनच त्यांनी 'बालसंस्कार वर्गां' चा उपक्रम सुरू केला – जेथे मुलांमध्ये नीतिमूल्यं, आदर्श विचार आणि सुसंस्कार रुजवले जातात. हे वर्ग म्हणजे सामाजिक परिवर्तनाचं बीजारोपण आहे.

सन २०२३ च्या महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यातही त्यांनी समाजाप्रती असलेल्या सेवाभावाचं उदाहरण मांडलं. त्यांनी स्पष्टपणे सांगितलं की, आपण रक्त बनवू शकत नाही – पण देऊ शकतो. म्हणूनच आज त्यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबिरांचे नियमित आयोजन होते. हे कार्य केवळ आरोग्यसेवेचं नव्हे, तर समाजाला 'देण्याची' आणि 'सहभागी होण्याची' शिकवण आहे.

आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या सामाजिक, आध्यात्मिक, आणि नैतिक कार्यामुळे त्यांना महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्च 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार सन २०२२ मध्ये जाहीर करण्यात आला, जो १६ एप्रिल २०२३ रोजी खारघर, नवी मुंबई येथे पार पडला. हा पुरस्कार केवळ त्यांच्या कार्याचा सन्मान नाही, तर त्यांच्या विचारांची व परिणामांची पावती आहे.

आज जो रस्ता आपण त्यांच्या नावाने नामांकित करत आहोत, तो केवळ वाहतुकीचा मार्ग नाही, तर तो विचारांचा, संस्कारांचा आणि सेवा–धर्माचा मार्ग आहे. पुढच्या पिढ्यांना हा मार्ग चालताना सतत आठवण होईल – की समाज बदलायचा असेल, तर विचार आणि कृती यांची सांगड घालावी लागते. लवकरच प्रवेशद्वाराचे लोकार्पण व नगरपालिकेत तैलचित्र अनावरणाचा यापेक्षा मोठा कार्यक्रम आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या उपस्थितीत ठेवण्याची माझी इच्छा आहे. यासाठी देखील आप्पा स्वारींची आज्ञा मिळेल व या शुभकार्याचे आपण सर्व साक्षीदार होऊ हा मला विश्वास आहे असे उदगार – आमदार मंगेश रमेश चव्हाण यांनी काढले.

# बिटको महाविद्यालयात इ.१२ वी परिक्षेतील गुणवंतांचा गौरव

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिकरोड :- गोखले एज्युकेशन सोसायटीच्या नाशिकरोड येथील बिटको महाविद्यालयात फेब्रुवारी/ मार्च २०२५ मध्ये झालेल्या इ.१२ वी कला, वाणिज्य व विज्ञान तसेच एचएस- व्हीसी तील गुणवंत विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. कृष्णा शहाणे यांनी पेढे, गुलाबपुष्प व गुणपत्रिका देऊन सन्मानित केले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. कृष्णा शहाणे यासह कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रणाली पाथरे , सौ. आर. एस. पाटील, शालिनी शेळके, योगेश महाजन, संदीप आरोटे, संजय परमसागर , मीना शिंदे , भूषण कोतकर , मनीषा देशमुख यासह शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी, सत्कारार्थी विद्यार्थी व पालक आदी उपस्थित होते. सत्कारार्थी विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. कृष्णा शहाणे यांनी यथोचित मार्गदर्शन करतांना ई. १२ वीचा अभ्यास हा महत्त्वाचा टप्पा सर केला आहे. हे क्षण आयुष्यात स्मरून अधिक जोमाने पुढे वाटचाल करा. योग्य ध्येय ठरवा. सातत्याने वाचन सुरू ठेवा.




आपले आरोग्य जपा असे सांगून गुणवंत विद्यार्थ्यांना भावी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रस्ताविक पर्यवेक्षिका प्रणाली पाथरे यांनी करतांना कला शाखेचा निकाल ८१.२१ % तर वाणिज्य शाखेचा ९७.०५% तर विज्ञान शाखेचा ९७.८१ % तसेच एच.एस.सी. व्होकेशनल विभागाचा निकाल १०० % लागला असल्याचे सांगितले . गुणवंत विद्यार्थ्यांचा घोषित निकाल घोषित केला. यात प्रथम, द्वितीय व तृतीय अनुक्रमे खालीलप्रमाणे:-

कला शाखा:-
कु.श्रेया संतोष कांबळे (५२९/ ६००) - ८८.१७ %,
कु.कोमल सुहास पगारे (४९२/ ६००) - ८२ %
कु.नम्रता प्रवीण बडगुजर (४९१/ ६००) - ८१.८३ %

वाणिज्य शाखा:-
कु.उत्तरा शैलेंद्र गिरासे (५६३/६००) - ९३.८३ %
मोहम्मद अली वासीम खान पठाण (५६१/६००) - ९३.५० %
कृष्णा दिलीप गवारे (५५९/६००) -९३.१७ %

विज्ञान शाखा :-
आरुष रियाज शेख (४७१/६००)- ७८.५० %
कु. मानसी भगवंत जाधव (४६३/६००)- ७७.१७ %
शर्विल संदीप निकुंभ (४५८/६००)- ७६.३३ %

एच.एस.सी.व्होकेशनल शाखा :-
सोनम बजरंगी यादव (एमएलटी )- (४९०/६००) - ८१.६७ %
तेजस खंडू वारुंगसे (ईएलटी )- (३५२/६००) - ५८. ६७%

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी व पालकांनी मनोगते व्यक्त करताना शिक्षकांप्रती आदरभाव व्यक्त करून त्यांच्या मार्गदर्शनामुळे व पालकांच्या सहकार्यामुळेच सुयश प्राप्त झाल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौं. शालिनी शेळके यांनी केले. सौ. आर. एस. पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# शुरवीर छावा - श्री. छत्रपती संभाजी महाराज

**दै. आवाज वृत्तसेवा...**

छत्रपती संभाजी महाराजांच्या त्यागाला, शौर्याला, विद्वत्तेला, कर्तृत्वाला, बलिदानाला जगाच्या इतिहासात तोड नाही. संभाजीराजांच्या बलिदानाने गवताला भाले फुटले. हतबल झालेल्या मराठ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. आपल्या देशाची अखंड प्रेरणा, अखंड स्फूर्ती म्हणजे छत्रपती संभाजी महाराज. लेखणी आणि तलवार चालविणारा प्रतिभासंपन्न राजा म्हणजे संभाजी महाराज. आज (दि. १४ मे) त्यांची जयंती. त्यानिमित्ताने.. अवघे ३२ वर्षांचे आयुष्य लाभलेल्या छत्रपती संभाजी महाराजांनी भारतीय इतिहासात जे शौर्य, धैर्य आणि औदार्य दाखविले त्याला तोड नाही. त्यांना प्रत्यक्ष पाहणारा फ्रेंच पर्यटक ॲबे कॅरे म्हणतो 'संभाजीसारखा पराक्रमी, बुद्धिमान आणि सुंदर राजपुत्र मी अन्यत्र पाहिला नाही.' संभाजीराजे शूर पराक्रमी तर होतेच; तितकेच ते महाबुद्धिमान होते. बालपणापासूनच ते अनेक विषयांत निष्णात होते. आजी जिजाऊ मासाहेब आणि वडील छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या संस्कृत शिक्षणाची व्यवस्था केली. ते संस्कृत भाषेचे महापंडित होते. त्यांनी बुधभूषण नावाचा संस्कृत ग्रंथ लिहिला. ते संस्कृत भाषेचे मोठे चिकित्सक होते. त्यांच्या पांडित्यावर आणि विद्वत्तेवर प्रभावित होऊन गागाभट्टांनी 'समयनय' हा ग्रंथ संभाजीराजांना अर्पण केलेला आहे. यावरून संभाजीराजांच्या विद्वत्तेची प्रचिती येते. केवळ संस्कृतच नव्हे, तर हिंदी भाषेवर देखील त्यांचे प्रभुत्व होते. त्यांनी हिंदी भाषेतून नखशिख, नायिकाभदे आणि सातसतक हे तीन हिंदी ग्रंथ लिहिले. त्यांची हिंदी अभिजात होती. मराठी भाषेबद्दल त्यांना स्वाभाविकपणे अभिमान होता. परंतु जगाच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, परराष्ट्र व्यवहार यासाठी अनेक भाषा ज्ञात असणे अत्यावश्यक आहे ही त्यांची भूमिका होती. शिवरायांना संभाजीराजांबद्दल प्रचंड प्रेम आणि अभिमान होता. त्यांनी कधीही राज्याची अभिलाषा बाळगली नाही. संभाजीराजे शिवरायांना पन्हाळा येथे म्हणाले, दूधभात खाऊन तुमच्या पायाची सेवा करेन, परंतु राज्याची वाटणी नको. संभाजीराजे विनयशील, प्रेमळ, स्वराज्यनिष्ठ होते, तितकेच ते शूर, पराक्रमी, कर्तव्यकठोर होते. निद्रेचे चार तास सोडले तर वीस तास अखंडपणे शेवटच्या क्षणापर्यंत ते लढत राहिले. शिवरायांच्या काळात औरंगजेब स्वत: महाराष्ट्रात आला नव्हता. परंतु संभाजीराजांच्या काळात सुमारे सात लाखांची फौज घेऊन तो स्वराज्यात उतरला. शंभूराजांना पकडण्यासाठी आणि रयतेचे स्वराज्य चिरडण्यासाठी त्याने जंग जंग पछाडले. तो धूर्त, कावेबाज, पाताळयंत्री आणि निर्दयी होता. बापाला, भावाला, मुलांना, अनेक सुफी संतांना छळणारा औरंगजेब महाराष्ट्रात सुमारे २७ वर्षे ठाण मांडून होता. त्याला पूर्ण कल्पना होती की, मराठ्यांना चिरडल्याशिवाय संपूर्ण भारत एकछत्री अंमलाखाली येणार नाही. त्याला सर्व ताकदीनिशी प्रतिकार करण्याचे काम छत्रपती संभाजीराजांनी केले. एका वेळेस त्यांना मोगल, सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज, मोगल आणि अंतर्गत शत्रू यांच्याविरुद्ध लढावे लागले. परंतु ते हतबल, निराश किंवा नाउमेद झाले नाहीत. संकटाला ते निर्भीडपणे सामोरे गेले. संकटसमयी ते लढणारे होते, रडणारे नव्हते. मोगल, पोर्तुगाल, इंग्रज, सिद्धीच्या तुलनेत त्यांच्याकडे अपुरी साधने होती. परंतु दुर्दम्य इच्छाशक्ती, स्वभाषा, स्वसंस्कृती, वतन आणि प्रजेवर अपार निष्ठा या बळावर ते लढत होते. औरंगजेबाचे महत्त्वाचे केंद्र असणार्या बुर्हाणपुरावर त्यांनी हल्ला केला. जंजिरा जिंकण्याचा अंतिम टप्पा त्यांनी गाठला होता. गोवा जिंकण्यासाठी मांडवी नदी पार करण्याचा प्रयत्न केला. औरंगजेबाने पैसे पेरले, अनेक किल्ले जिंकले, त्याने जंग जंग पछाडले; परंतु मराठा मुलखातील शिवशंभूच्या मावळ्यांची मनं त्याला कधीही जिंकता आली नाहीत. संभाजीराजांनी त्याला हैराण केले. त्यामुळेच औरंगजेबाचा दरबारी इतिहासकार खाफी खान म्हणतो, 'संभाजी म्हणजे मोगलांसाठी वडिलांपेक्षा दहापटींनी तापदायक आहे.' इतका दरारा संभाजीराजांचा होता. युद्धाच्या रणधुमाळीत प्रजेच्या कल्याणाकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही. त्यांनी अनेक न्यायनिवाडे केले. शेतकर्यांना भरघोस मदत केली. प्रजेच्या संरक्षणाला त्यांनी प्राधान्यक्रम दिला. महिलांच्या रक्षणासाठी आणि स्वातंत्र्यासाठी ते अत्यंत दक्ष होते. आपली महाराणी येसूबाईंना त्यांनी स्वराज्याचे कुलमुखत्यार केले. त्यांच्या नावाचा 'श्री सखी राज्ञी जयतू' असा शिक्का बनविला. आपल्या पत्नीला सर्वाधिकार देणारे संभाजीराजे स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. संभाजीराजे निर्व्यसनी, नीतिमान आणि समतावादी होते. त्यांना भेदभाव मान्य नव्हता. ते बुद्धिप्रामाण्यवादी होते. त्यांनी आपल्या सहकारी, सैनिकांना, सरदारांना अत्यंत प्रेमाने वागविले. याचे वर्णन समकालीन ॲबे कॅरे करतो की, 'ते वयोवृद्ध आणि समवयस्क सैनिकांना अत्यंत मायेने आणि आदराने वागवतात. जखमी सैनिकांना स्वत: भेटून औषधोपचारांबाबत चौकशी करतात.' यावरून त्यांचा प्रेमळपणा आणि विनयशीलता स्पष्ट होते. त्यांनी ज्याप्रमाणे स्वराज्यरक्षण आणि स्वराज्यसंवर्धनाचे कार्य कैले, त्याप्रमाणे त्यांनी धार्मिक परंपरा जतन करण्याचे देखील महान कार्य केले. मोगलांनी जेव्हा गंगाधर कुलकर्णी नामक व्यक्तीला सक्तीने मुसलमान केले होते, त्याला स्वधर्मात घेण्याचे काम संभाजीराजांनी केले. शिवरायांनी शंभूराजाला बालपणापासून शौर्याचे, स्वाभिमानाचे, राजनीतीचे शिक्षण दिले. पुरंदर तहाच्या पूर्ततेसाठी आठव्या वर्षी संभाजीराजे मिर्झाराजे जयसिंगाच्या छावणीत गेले. वयाच्या आठव्या वर्षी स्वराज्य निर्मितीसाठी शत्रूच्या गोटात जाणारा पहिला बालवीर म्हणजे शंभूराजे आहेत. वयाच्या नवव्या वर्षी ते वडिलांसोबत आग्र्याला गेले. तेथे त्यांनी आपल्या वडिलांकडून स्वाभिमानाचे आणि साहसाचे शिक्षण घेतले. वयाच्या नवव्या वर्षी त्यांना वाराणसीत स्वराज्यापासून दूर राहावे लागले. शिवरायांनी दक्षिण भारत जिंकला. उत्तर भारत जिंकण्याचे वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शंभूराजांनी नियोजन केले होते. दरम्यानल औरंगजेबाच्या सरदारांनी शंभूराजांना पकडले. त्यांची सुटका करण्यासाठी मोठा प्रयत्न झाला नाही, इतकी औरंगजेबाची दहशत होती. सरंजामदार, सनातनी आणि औरंगजेब यांनी संभाजीराजांना खूप छळले. सुमारे ३९ दिवस औरंगजेबाने संभाजीराजांचा छळ केला. त्यांची विटंबना केली, त्यांना उंटावर बसवून विदुषकाचा पेहराव घालून अपमानित केले. डोळे काढले, जीभ कापली; परंतु संभाजीराजे औरंगजेबाला शरण गेले नाहीत. त्यांनी कोणत्याही प्रकारची तडजोड केली नाही. आपल्या वडिलांनी, आजी-आजोबांनी निर्माण केलेले स्वराज्य, रक्षिलेली संस्कृती औरंगजेबाच्या चरणावर अर्पण केली नाही. त्यांचे प्रचंड हाल हाल केले. परंतु संभाजीराजे झुकले नाहीत, वाकले नाहीत. रडले नाहीत. मरण पत्करले; पण शरण गेले नाहीत. संभाजीराजांच्या त्यागाला, शौर्याला, विद्वत्तेला, कर्तृत्वाला, बलिदानाला जगाच्या इतिहासात तोड नाही. अशा शंभूराजाची प्रेरणा घेऊन पुढे राजाराम महाराज, धनाजी-संताजी, महाराणी ताराबाई आणि लाखो जनता औरंगजेबाविरुद्ध लढत राहिली. शंभूराजांच्या बलिदानाने गवताला भाले फुटले. हतबल झालेल्या मराठ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. आपल्या देशाची अखंड प्रेरणा, अखंड स्फूर्ती म्हणजे शंभूराजे. लेखणी आणि तलवार चालविणारा प्रतिभासंपन्न राजा म्हणजे संभाजीराजे आहेत.



*** शब्दांकन - कु. दिनेश बी. पगारे**

## लोककवी डॉ.वामनदादा कर्डक यांचे देशवंडीतील स्मारक पूर्णत्वास नेऊन लोकार्पण करणे हि सत्ताधाऱ्यांची नैतिक जबाबदारी : प्रा.शरद शेजवळ

**दै. आवाज वृत्तसेवा...**

सागर निकाळे, निफाड (प्रतिनिधी) - शेतकरी, कामगार, कष्टकरी, शेतमजूर, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय वंचित घटकाला केंद्रबिंदू म्हणून वामनदादा कर्डक यांनी शोषित वंचित दुर्लक्षित घटकाची व्यथा वेदना आपल्या साहित्य गीत, कवन, गझल शाहिरीतून जगासमोर मांडली.जगभरात वामनदादा कर्डक यांचे साहित्य रसिक असून देशवंडी गावातील त्यांचे स्मारक अतिशय दयनीय अवस्थेत आहे.लोककवी डॉ.वामनदादा कर्डक यांचे देशवंडीतील स्मारक पूर्णत्वास नेऊन लोकार्पण करणे हि सत्ताधाऱ्यांची नैतिक जबाबदारी असल्याचे मत लोककवी वामनदादा कर्डक यांच्या हयातीत व फायदेशीर अनुमतीने स्थापन झालेल्या लोककवी वामनदादा कर्डक प्रतिष्ठानचे संस्थापक कार्याध्यक्ष प्रा.शरद शेजवळ यांनी व्यक्त केले. महामित्र परिवार, लोककवी वामनदादा कर्डक प्रतिष्ठान आद्य क्रांतिकारक राघोजी ब्रिगेड यांच्या वतीने येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे वामनदादा कर्डक यांच्या २१ व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना त्यांच्या गीत गझल काव्य शाहिरीतून शाहिरी अभिवादन सभेच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.शरद शेजवळ हे बोलत होते.

लोकशाहीर डॉ.वामनदादा कर्डक यांनी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आपल्या ओजस्वी वाणीतून आणि समर्थ लिखाणातून महाराष्ट्राच्या घरांघरांत खेड्यापाड्यात, वाडीतांड्यांत पोहचवण्याचे काम केलेबुद्ध, फुले, आंबेडकर यांचा विचार हा वामनदादांचा श्वास होता,ऊर्जाकेंद्र होते.हे विचार प्रभावीपणे प्रसारित करत वामनदादा जीवनाच्या शेवटापर्यंत फिरत राहिले असे मत जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते महामित्र दत्ता वायचळे यांनी व्यक्त केले.

लोककवी डॉ.वामनदादा कर्डक प्रतिष्ठान नाशिक कलापथकाचे वामनदादांच्या निवडक गीतांचे सादरीकरण ह्यावेळी करण्यात आले. सागर भालेराव ह्यावेळी वामनदादा कर्डक यांचे पैदा हो तो भीमसा नर पैदा हो,एक नया आंबेडकर पैदा हो। हे गीत सादर केले तर सुनील कुर्हे खोपी कुपी सोडून साऱ्या माड्या लोळविणार,मी वादळ वारा,मी वामन वाणी जातो मी वामनवाणी गातो,जातो तिथे पेरीत जातो चिल्या पिल्यांचा चारा हे गीत सादर केले तर प्रा.शरद शेजवळ यांनी माणसा इथे मी तुझे गीत गावे असे गीत गावे तुझे हित व्हावे असे तुझे माझे नाते दळावे तुझ्या संकटाशी इथे मी लढावे हे गीत सादर केले. महामित्र दत्ता वायचळे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रा.शरद शेजवळ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.सुनील कुर्हे,राजेंद्र दिवे,प्रा.के.एस.केवट,प्रा. जावेद शेख,माजी नगरसेवक श्रीकांत जाधव,अशोक घेगडमल,जमीर सय्यद अनिल वैद्य,कृष्णा सानप,कैलास गायकवाड,रंगनाथ मुसळे,नंदू सोनवणे,सागर भालेराव,भाऊसाहेब पवार,प्रकाश शिरसाट आदी मान्यवर उपस्थित होते.

## 'विकृत लेखन' पुरस्कार हवा !

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मंजिता चौधरी, दहिसर, मुंबई - हल्ली सर्वच् मराठी वाहिन्यांवरील मालिकांतील कथानके विकृतीने बरबटलेल्या असतात. किंबहुना जास्तीत जास्त विकृत कोण लिखाण करते, त्याअनुरुप प्रसंग दाखवते यात जणू स्पर्धाच लागलेली असते. ओघाने उरलासुरला मराठी प्रेक्षकवर्ग वीट येऊन दुरावत चालला आहे हे घटत्या टीआरपीन्वये जाणूनही 'विकृती स्पर्धा ' सुरुच् आहे.

त्याअनुषंगाने उद्वेगाने हेच सुचवावेसे वाटते की, दरवर्षी वर्ष सरताच् सर्व वाहिन्या आपल्या मालिकांतील कलाकारांसाठी पुरस्कार सोहळ्यांचे आयोजन करतात, त्यात जास्तीत जास्त विकृत कोण लिहीते, कोणती मालिका दाखवते यासाठी पण पुरस्कार ठेवावा. जेणेकरुन स्वतःची पाठ थोपटून घेत त्यांचेही आत्मसमाधान व्हावे.